ISBN : 978-93-24457-17-6



Rayat Shikshan Sanstha's

## Annasaheb Awate Arts, Commerce & Hutatma Babu Genu Science College, Manchar,

Tal - Ambegaon, Dist - Pune, Pin - 410503
Reaccredited by NAAC with 'B' Grade

NATIONAL SEMINAR
ON

# CHANGING INDIAN FOREIGN POLICY

**30th & 31st January, 2017**

Sponsored by
BCUD, Savitribai Phule Pune University

Organized by
DEPARTMENT OF HISTORY & POLITICAL SCIENCE
ANNASAHEB AWATE ARTS, COMMERCE &
HUTATMA BABU GENU SCIENCE COLLEGE, MANCHAR,
TAL - AMBEGAON, DIST - PUNE, PIN - 410503 (MAHARASHTRA)
Ph : 02133-223160 Fax: 02133-223160
Website : www.aacmanchar.org
Email : aac.manchar@gmail.com

Scanned by CamScanner

**Publisher**
Department of History & Political Science
Annasaheb Awate Arts, Commerce &
Hutatma Babu Genu Science College, Manchar,
Tal- Ambegaon, Dist.- Pune 410503

**Director**
Prin. Dr. Gaikwad P. N.-

**Editor**
Prof. Sangale B. K.
Prof. Mrs. Supekar V. P.

**ISBN : 978-93-24457-17-6**

**Printer**

**Success Publications**
Radha Krishna Apartment, 535, Shaniwar Peth,
Opp. Prabhat Theatre, Pune - 411030.
Contact - 9422025610, 8390848833, 020-24433374, 24434662
Email- marketing@sharpmultinational.com
Website- www.sharpmultinational.com

**Organizing Committee**

| | |
|---|---|
| Prin. Dr. Gaikwad P.N. | - Director |
| Prof. Dr. Gholap L. B. | – Vice-principal |
| Prof. Deshmukh V. K. | - Vice-principal |
| Prof. Sangale B. K. | – Convener |
| Prof Mrs. Supekar V. P. | - Convener |
| Prof. Randive T. Y. | - Co- Convener |
| Dr. Jadhav S. H.- . | - Co- Convener |

**Disclaimer**
The views expressed by the authors in their articles are their own. The Editor Board is not responsible for them.



Scanned by CamScanner

ISBN : 978-93-24457-17-6


| | | |
|---|---|---|
| 21 | **INDIA-RUSSIAN MILITARY AND ECONOMIC RELATIONSHIP**<br>Asst. Prof. Shirsath Sandip Haribhau | 73 |
| 22 | **भारताच्या परराष्ट्र धोरणाची पाठराखण**<br>प्रा. बाळासाहेब भानूदास खरात | 76 |
| 23 | ***India's Foreign Policy between 1947 to 1974***<br>Dr. Gorde Vilas Soma | 78 |
| 24 | **"भारताचे बदलते धोरण आणि अलिप्ततवाद"**<br>प्रा. डॉ. संतोप तुकाराम कदम | 82 |
| 25 | **भारताचे परराष्ट्र धोरण व पंडित नेहरूंचे पंचशील तत्व: ऐतिहासिक दृष्टीक्षेप**<br>प्रा. सातपुते. आर .बी. | 86 |
| 26 | **MERCHANDISE EXPORTS FROM INDIA SCHEME (MEIS) UNDER FOREIGN TRADE POLICY (2015 – 2020)**<br>PROF. KEKANE M. A. | 88 |
| 27 | **भारताचे पाकिस्तानविषयीचे बदलते धोरण**<br>प्रा. फुलारी अर्चना सुभाष | 93 |
| 28 | **FOREIGN TRADE AND EXPORT IMPORT POLICY**<br>Mr. Gajanan Dagaduba Chaudhari | 96 |
| 29 | **भारताचे परराष्ट्र धोरण आणि नरेंद्र मोदी**<br>प्रा.डॉ. राहुल पंडित | 101 |
| 30 | **भारतीय परराष्ट्र धोरणाची पार्श्वभूमी**<br>प्रा. वाक्चौरे संजय दिवाणजी | 103 |
| 31 | **परराष्ट्र धोरणातील भारताची भूमिका**<br>श्री. संजय हणमंत भोसले | 106 |
| 32 | **केंद्रिय सत्तांतरानंतरची भारतीय परराष्ट्र धोरणाची रुपरेखा**<br>प्रा. नितिन.एम. नन्नावरे | 108 |
| 33 | **भारतातील घुसखोरी एक गंभीर समस्या**<br>प्रा. ज्योत्स्ना द. म्हस्के | 110 |
| 34 | **भारतीय राजकारणातील पं . नेहरूंची भूमिका**<br>**प्रा . तारू एन . एम .** | 113 |
| 35 | **India and USA – The Foreign Policy Issues**<br>Mrs. Meenal K. Kshirsagar | 115 |
| 36 | **जागतिकीकरणा नंतरचे आंतरराष्ट्रीय राजकारण आणि भारत**<br>डॉ. बेग रेहानाआरा ईस्माइल | 119 |
| 37 | **CHANGING INDIAN FOREIGN POLICY**<br>Prof. Suresh Muluk | 122 |
| 38 | **महासत्ता अमेरिका उदय विकास: भारताचे अलिप्ततावादी धोरण व परराष्ट्र नीती उद्दिष्टे**<br>प्रा. सौ. वाघोले अरुणा रविंद्र | 124 |
| 39 | **भारताचे त्याच्या शेजारील राष्ट्रांशी असणारे संबंध**<br>**विशेष संदर्भ – केंद्रातील सत्ता परीवर्तनानंतरचे पराष्ध्र विषयक धोरण**<br>**भारत–चीन– सौहार्द व संघर्षाचे संबंध**<br>**(India - china - relation - Harmony and confict)**<br>**प्रा. संदिप घुगे** | 129 |
| 40 | **परराष्ट्रीय धोरणातील शीतयुध्दोत्तर काळातील भारत – रशिया संबंध**<br>श्री. चक्रभुजनारायण विठ्ठल दुर्गे | 131 |
| 41 | **CHANGING COMPOSITION OF INDIA'S FOREIGN TRADE AND DIPLOMACY**<br>Dr. Eknath S. Mundhe Dr. Balasaheb M.Munde | 133 |
| 42 | **स्वातंत्रोत्तर भारताचे परराष्ट्रीय धोरण**<br>प्रा.डॉ.आर.व्ही.ढेरे | 136 |




Scanned by CamScanner

ISBN : 978-93-24457-17-6

# भारताचे परराष्ट्र धोरण आणि नरेंद्र मोदी

प्रा.डॉ. राहुल पंडित
राज्यशास्त्र विभाग प्रमुख
श्री शिवछत्रपती महाविद्यालय, जुन्नर

**प्रस्तावना:—**

१९९० नंतरच्या कालखंडात जागतीकरण, उदारीकरण, व खाजगीकरणातून पुढे जातांना व परावलंबित्व वाढल्यामुळे बहुतांश सर्वच राष्ट्रे आपल्या परराष्ट्र धोरणाची आखणी करतांना शेजारील राष्ट्रे व अन्य राष्ट्रांशी मैत्रीपुर्ण व सोहदार्यपुर्ण सबंध प्रस्थापित करतांना दिसतात. भारताने सुरवातीपासुनच जगातील इतर देशासोबत मैत्रीभाव व परस्पर सहकार्य या भावनेतून सबंध प्रस्थापित करण्याचा यशस्वी प्रयत्न केला आहे. व त्याद्वारे सार्वभौमत्व, प्रादेशिक अखंडता आणि शांततापुर्ण सहअस्तित्व या तत्वावर अधारीत परराष्ट्र धोरणाची निर्मिती केली आहे. स्वातंत्र्यापासून ते आतापर्यंत भारताच्या परराष्ट्र धोरणात बदलत्या परिस्थितीला अनुसरुन सातत्य आणि बदल झालेला बघावयास मिळतो. भारतीय परराष्ट्र धोरणाचे शिल्पकार पंडित जवाहरलाल नेहरु यांनी अलिप्ततावाद, वसाहतवाद, साम्राज्यवादाला विरोध, निशस्त्रीकरण, जागतिक शांतता या तत्वांना प्राधान्य देवून परराष्ट्र धोरणाची आखणी केलेली आहे. अलिप्ततावादाचा स्विकार करुन दोन्ही महासत्ताकडून आवश्यक ती मदत मिळवली आहे. शितयुध्दाच्या समाप्तीनंतर भारताने बदललेल्या जागतिक समिकरणाला अनूसरुन आपल्या परराष्ट्र धोरणात बदल केला आहे.

२०१४ साली सत्तापरिवर्तन होवून पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी सत्तासुत्रे हाती घेतली. त्यांनी आपल्या शपथ विधी सोहळयात सार्क संघटनेतील देशांच्या नेत्यांना बोलावून आपली परराष्ट्र विषयक भूमिका कशी असेल याची झलक दाखवून दिली. नंतर आडिच वर्षाच्या काळात अनेक राष्ट्रांना भेटी दिल्या तसेच त्या राष्ट्रांना आमंत्रित केले. भेटीदरम्यान अनेक महत्वपुर्ण करार केले व परकीय गुंतवणुक भारतात आणण्याचा यशस्वी प्रयत्न केला. त्यांच्या परराष्ट्र धोरणावर मोठया प्रमाणात टिकाही झाली. प्रस्तुत शोधप्रबंधातून नरेंद्र मोदी यांचे परराष्ट्र विषयक धोरण यावर संक्षिप्त आढावा घेण्यात आला आहे.

**प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांची परराष्ट्र विषयक भूमिका**

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी सुरवातीपासूनच आत्मविश्वासी भूमिकेतून परराष्ट्र विषयक धोरणाची आखणी केली आहे. त्यांनी सुरवातीपासून चालत आलेल्या परराष्ट्र धोरणाच्या तत्वात अमुलाग्र बदल न करता पुर्व प्रधानमंत्री मनमोहन सिंग व अटलबिहारी वाजपेयी यांच्या काळात असणारी परराष्ट्र विषयक भूमिका वेगळया पद्धतीने मांडण्याचा यशस्वी प्रयत्न केला आहे. जेंव्हा आपण भारताच्या परराष्ट्र धोरण विषयक मांडणी करतो तेंव्हा परराष्ट्र धोरणाचे शिल्पकार पंडित जवाहरलाल नेहरु यांनी संसदेत केलेल्या विधानावर चिंतन करावेच लागेल, ते म्हणतात, परराष्ट्र धोरण हे आर्थिक धोरणाचा परिणाम असतो, आम्ही आतापर्यंत कोणत्याच रचनात्मक आर्थिक योजना किंवा आर्थिक धोरण बनविले नाही. जेंव्हा आम्ही असे करु तेंव्हा आम्ही या सभागृहात सर्वात जास्त भाषणे परराष्ट्र धोरणाच्या निर्धारणावर करु. यातून एक गोष्ट निश्चित होते की, आपल्या देशाचे परराष्ट्र धोरण आपली असणारी आर्थिक स्थिती यावर आवलंबुन आहे. नरेंद्र मोदी आणि त्यांच्या टिमने थोडासा संरचनात्मक बदल करुन व वरील मुद्यांना अनुसरुन लष्करी व आर्थिक क्षेत्रात अमुलाग्र परिवर्तनास महत्वाचे स्थान दिले. भारताची अंतर्गत सुरक्षा आणि आर्थिक विकास हे मुख्य लक्ष पुढे ठेवूनच त्यांनी अनेक देशाचे दौरे केले. संयुक्त राष्ट्रात या मुद्याला अनुसरुनच त्यांनी आपल्या भाषणाची मांडणी केली. नरेंद्र मोदी हे भारताचे पहिले असे प्रधानमंत्री आहेत की त्यांनी १७ वर्षाच्या दिर्घकालावधीनंतर नेपाळ देशास भेट दिली व त्यांच्या संसदेस संबोधित केले . भारतासाठी हा दौरा ऐतिहासीक व गौरवशाली होता कारण नेपाळच्या इतिहासात पहिली वेळेस इतर देशाच्या प्रधानमंत्र्यानी त्यांच्या संसदेस संबोधित केले व याचा मान प्रधानमंत्री व भारतास जातो. २८ वर्षानंतर अस्ट्रेलिया, ३१ वर्षानंतर फिजी, आणि ३४ वर्षनंतर सेशेल्स या राष्ट्रास द्विपक्षिय भेटी दिल्या व विविध महत्वपुर्ण करार केले.

नरेंद्र मोदी यांनी आपल्या प्रभावशाली विचारसरणीतून संयुक्त राष्ट्र, ब्रिक्स, सार्क आणि जी—२० शिखर संम्मेलनात आर्थिक सहकार्य, जागतिक समस्या आणि नविन राजकीय समिकरणाविषयी उपायात्मक मत मांडले. त्यांच्या शासनातील परराष्ट्र निती संतुलित, सामंजस्यपणा आणि योजनाबद्ध बघावयास मिळते. एका बाजुला आपला मित्र राष्ट्र रशिया सोबत मैत्रीचे धोरण ठेवून दुस—या बाजूला अमेरिका सोबत संबंध सुधारण्यावर भर दिला. तसेच अरब राष्ट्रासोबत मैत्री करण्यास सुरवात केली. श्रीलंका व नेपाळ या राष्ट्रांना भेटी देवून चिनवर प्रभाव टाकण्याचा यशस्वी प्रयत्न केला आहे. इकोनॅमिक टाईमसच्या अहवालानूसार भारतात २०१४—१५ साली बारा देशांनी १९.३८ बिलियन डॉलरची प्रत्यक्ष गुंतवणूक केली आहे.

**पाकिस्तान बाबतचे धोरण:—**

निवडणुकांच्या कालखंडात जरी भाजपाने पाकिस्तान बाबत आक्रमक भूमिका घेतली असली तरी सत्तेत आल्यानंतर मात्र मोदी यांनी द्विपक्षीय चर्चेवर भर देत उभय देशातील संबंध सुधारण्याचा प्रयत्न केला. २०१५ साली रशियातील उफा येथे ब्रिक्स व एमसिओच्या शिखर परिषदेत नरेंद्र मोदी व नवाझ शरिफ यांच्या द्विपक्षीय बैठकीत सीमेवर शांतता, मच्छिमारांची सुटका, धार्मिक पर्यटन या विषयावर चर्चा होवून मतैक्य झाले. दहशतवाद या मुद्यावर तोडगा काढण्यास राष्ट्रिय सल्लागार पातळीवर चर्चा करण्याचे ठरले. त्याला अनुसरुन भारताने पाकिस्तानला निमंत्रण दिले. परंतू पाकिस्तान घेतलेल्या भारतातील फुटिरतावादी नेत्याच्या भेटीच्या मुद्यावरुन ही बैठक रद्द करण्यात आली. पाकिस्तान कडून सीमेवर होणारा सातत्याने होणारा गोळीबार तसेच दहशतवाद्यांना मिळणारी पाक कडून मदत व त्यातुन झालेला उरी येथिल दहशतवादी हल्ला या पार्श्वभूमिवर भारतीय सैन्याने पाकव्याप्त काश्मिरमध्ये सर्जिकल स्ट्राईक करुन दहशतवाद्यांची प्रशिक्षण स्थळे उध्दवस्त केली व उरी हल्ल्याचा बदला घेतला. पाकच्या या हल्लेखोर प्रवृतीला व दहशतवादाला खतपाणी घालण्याच्या भूमिकेला जोरदार धक्का देण्याचे काम नरेंद्र मोदीनी केले,



Scanned by CamScanner

ISBN : 978-93-24457-17-6

ते म्हणजे पाकिस्तान येथे होणा—या सार्क परिषदेवर बहिष्कार टाकला भारताच्या या भूमिकेचे समर्थन करीत इतर सदस्य देशांनीही या परिषदेवर बहिष्कार टाकला. नरेंद्र मोदी यांची बलुचिस्तानची भूमिकाही महत्वाची ठरते या दबावात्मक भूमिकेतून पुढे जातांना त्यांनी पाकिस्तान बाबतचे आपले परराष्ट्र धोरण बदलात्मक स्वरुपातून पुढे नेले.

**चिन बाबतचे धोरण:—**

भारत व चिन हे या दोन देशात एकमेकाबद्दल अविश्वासाचे वातावरण असल्या कारणाने अनेक मुद्यावरुन मतभेद झालेले आढळतात. उभय देशातील सीमावाद, चिनची घुसखोरी, पाकिस्तानला मदत हे प्रश्न भारताच्या दृष्टिने चिंताजनक आहेत. शी जिनपिंग यांनी पाकिस्तान दौ—यात पाकिस्तानला लहान भावाचा दर्जा देवून चायना—पाकिस्तान इकोनॅमिक कॉरिडोर (CPEC) या बहुकांक्षी योजनेची घोषणा केली. या योजनेमुळे भारताच्या बाहय व अंतर्गत सुरक्षेवर विपरीत परिणाम पडणार आहे. तसेच भारतासाठी सामरीक व आर्थिक दृष्टिने धोक्याचे ठरणार आहे. चिन व पाकच्या या योजनेला शह देण्यासाठी प्रधानमंत्री मोदी यांनी इंटरनॅशनल नॉर्थ—साऊथ ट्रान्सपोर्ट कॉरिडोर( INSTC) ही बहुकांक्षी योजना सुरु केली व आपले हिंदी महासागरावरील प्रभुत्व टिकुन राहावे त्यासाठी संबंधित राष्ट्राचे दौरे केले. चिनचा वाढता प्रभाव पाहता नरेंद्र मोदीनी बौध्द राष्ट्र जपानला आपला नवा मित्र बनवुन अनेक महत्वाचे करार केले जे की स्वरक्षणाच्या दृष्टिकोनातुन महत्वपुर्ण आहेत. चिनला शह देण्यासाठी लुक ईस्ट ऐवजी ॲक्ट ईस्ट या संकल्पनेवर मोदीजी यांनी भर दिला. ज्यातुन पुर्वेकडिल राष्ट्राशी मैत्रीपुर्ण संबंध प्रस्थापित करण्याचा यशस्वी प्रयत्न केला आहे.

वरील देशाबरोबरच इस्त्राईल बरोबर आपले अधिक घनिष्ठ संबंध प्रस्थापित करण्यावर भर दिला. तसेच अमेरिके सोबतही मैत्रीपुर्ण संबंधावर भर दिला. प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी बांगलादेश व श्रीलंका या दोन राष्ट्रासोबत मैत्रीपुर्ण संबंध प्रस्थापित करतांना ज्या मुद्यावरुन मतभेद होते ते कमी करण्याचा प्रयत्न केला आहे. त्यामध्ये बांगलादेश व भारत यातील समुद्रसीमावाद संपुष्टात आणला तसेच श्रीलंकन राष्ट्रपतीस आपल्या शपथविधी कार्यक्रमास बोलावून संबंध घनिष्ठ करण्याचा प्रयत्न केला आहे.

**निष्कर्ष:—**

मोदींच्या परराष्ट्र धोणावर काही प्रमाणात टिका होत आहे परंतू मे २०१४ पासून आतापर्यंत भारताच्या परराष्ट्र धोरणावर नजर टाकली तर याची जाणिव होते की, पारंपारीक परपराष्ट्र धोरणाचा मुळ ढाचा न बदलता आर्थिक व लष्करी सुरक्षेच्या दृष्टिकोनातून नरेंद्र मोदी व त्यांच्या टिमने बदलात्मक परिस्थितीत अनेक महत्वपुर्ण निर्णय घेवून तसेच संबंधित राष्ट्राशी करार करुन विकासात्मक धोरणांची रणनिती आखली आहे. राष्ट्रहित या मुद्याला प्राधान्य देण्यातून शेजारील राष्ट्रांबरोबरीनेच इतर राष्ट्राशी जवळीक निर्माण केली. तसेच त्यांच्या प्रयत्नातुन मोठया प्रमाणात परकीय गुंतवणूक झाली. तसेच भारताला संयुक्त राष्ट्रातील सुरक्षा परिषदेवर कायम सदस्यत्व मिळाले पाहीजे या भूमिकेतुन सुध्दा मोंदीचे परराष्ट्र धोरण सक्षमतेकडे जाणारे दिसते.

संदर्भ:— १. डॉ. शैलेंद्र देवळाणकर, भारताचे परराष्ट्र धोरण, विद्या बुक पब्लिकेशन, औरंगाबाद.
२. समाजप्रबोधन पत्रिका खंड—२ भारत आणि आंतरराष्ट्रीय भू—राजकारण
३. बुलेटिन ऑफ युनिक ॲकॅडमी, दिवाळी विशेषांक नोव्हेंबर २०१५
४. भारताचे परराष्ट्र धोरण, के.सागर पब्लिकेशन, पुणे.

Scanned by CamScanner